विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संचालक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| प्रकाशक | : | सध्दर्म प्रकाशन |
| प्रकाशन वर्ष | : | १९७५ |
| वर्ष | : | दहावें |
| अंक | : | पहिला |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३५**

Registered with the Registrar of Newspapers for India, under R.N. 20776/71

# सद्धर्म

त्रैमासिक

संचालक
गुंडोपंत हरिभक्त

वर्ष दहावें
अंक पहिला
पौष १८९६
जानेवारी १९७५
वार्षिक देणगी
किमान
दोन रुपये

* * * * * * *

## मानव जातीचा तरणोपाय

"None can regenerate this land of ours without the practical application and effective operation of the ideal of the oneness of all."

Swami Vivekanand
India and her Problems, p-41

"आपण सर्व मानव एक आहोत, सर्वत्र एकात्मता आहे, ही श्रद्धा प्रत्यक्ष व्यवहाराला लावून ती परिणामकारकरीत्या आचरणांत आणली गेल्याशिवाय या देशाचा कोणीही उद्धार करूं शकणार नाहीं."

सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी स्वामिजींनीं हें विधान केलें त्यापेक्षां, केवळ आपल्या देशाचीच नव्हे तर, साऱ्या जगाची परिस्थिती आतां कितीतरी पटीनें अधिक बिघडलेली आहे. अशा स्थितींत स्वामिजी आज जर हयात असते तर त्यांनीं तें विधान, फक्त भारताबद्दलच नव्हे तर, साऱ्या जगाबद्दल केलें असतें.

विज्ञानाच्या दुरुपयोगापायीं निर्माण झालेल्या आजच्या भयानक परिस्थितींत आपण सर्व मानव एक आहोत ही निष्ठा व्यवहाराला लावून तिचा आपल्या प्रत्यक्ष आचरणांत अवलंब करण्यांतच आतां मानवजातीचा तरणोपाय आहे, असें खुद्द वैज्ञानिकही आतां कंबर बोलूं लागले आहेत, ही त्यांतल्या त्यांत सुदैवाची गोष्ट आहे.

देव करो आणि वेळींच सर्वांचे डोळे उघडोत.

## या पहिल्या अंकांत

१. 'सर्वांभूतीं विठ्ठल' २
२. सत्यनारायणाचें नवें स्वरूप ३
३. स्वार्थाचा अभाव तेथें समृद्धि ११
४. तरच भविष्यकाळ उज्वल १४
५. 'ये, सिंहासन तुझ्यासाठीं मोकळें आहे! १५
६. संतवचनांचा मथितार्थ १६
७. तें ही एक सत्यच नव्हे का? १६

# 'सर्वांभूतीं विठ्ठल'

बिसोबा खेचरांची कीर्ति ऐकून नामदेव औंवढ्यास आले. बिसोबा देवळांत आहेत असें कळलें, म्हणून नामदेव देवळांत गेले. तेथें पाहातात तों त्यांना काय दिसलें?

पुढील हकिकत आपण नामदेवांच्याच रसाळ वाणीतून ऐकूं. नामदेव म्हणतात :

"देवावरी पाय ठेवूनि खेचर। निजेला परीकर निवांतचि ॥ १ ॥ देखोनियां नामा पावला विस्मया। कैसा हा प्राणीया देवो मेणें ॥ २ ॥ उठी उठी प्राण्या आंधळा तूं काय। देवावरी पाय ठेवियेले ॥ ३ ॥ विसोबा खेचर बोले नामदेवा। उठविलें जिवा कां रे माझ्या ॥ ४ ॥ देवावीण ठाव रिता कोठें आहे। विचारोनी पाहे नामदेवा ॥ ५ ॥ जेथें देव नसे तेथें माझे पाय। ठेवी पां अन्वय विचारूनी ॥ ६ ॥

नामदेव आतां विचारांतच पडले. कारण : "नामा पाहे अवघा जिकडे तिकडे देव। कोठें रिता ठाव न देखेची ॥ ७ ॥"

नामदेवांनीं पाहिलें तर जिकडे तिकडे सर्वत्रच त्यांना शंकराच्या पिंडीच पिंडी दिसूं लागल्या! त्या पाहून एकदम त्यांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला; आणि तत्काळ त्यांनीं विसोबांच्या पायांवर डोकें ठेविलें, ते म्हणतात :

"इतुकें देखोनियां चरणीं घाली मिठी। सांठविला सृष्टीं अवघा देव ॥ १ ॥ तिन्ही त्रिभुवनीं आपण व्यापुनी। आनंदें कोंदोनी राहियेला ॥ २ ॥ श्रीगुरुचे पाय जीवें न विसंबत। मनोवृत्तिसहित ओंवाळिलें ॥ ३ ॥ डोळियांचे डोळे उघडिले जेणें। आनंदाचें लेणें लेवविलें ॥ ४ ॥ जन्ममरणाचें तोडिलें सांकडें। कैवल्याचें पुढें दावियेलें ॥ ५ ॥

नामदेवांची ती अवस्था पाहून मग विसोबांनीं त्यांना उपदेश केला. विसोबा म्हणाले :

"सर्वकाळीं परमात्मा आहे सर्व देशीं। भावना हे अहर्निशीं दृढ धरी ॥ १ ॥ संत-समुदाय मिळती जेथें जेथें। जाय तेथें तेथें लोटांगणीं ॥ २ ॥ चिंता न करी नाम्या येणें तरसी जाण। तुज सांगितली खूण निर्वाणीची ॥ ३ ॥

ती 'निर्वाणीची खूण' घेऊनच मग नामदेव आपल्या आयुष्याच्या पुढील मार्गाला लागले. ती 'खूण' नामदेवांच्या अंतर्यामीं किती बिंबली याचें प्रत्यंतर आपल्याला त्यांनीं दिलेल्या एका पुढील हकिकतींत सांपडते. नामदेव वर्णन करतात.

"नामा स्वयंपाक करोनि बैसला। केशव श्वान रूपें आला। रोटी घेऊनि पळाला। सर्वांभूतीं केशव ॥ १ ॥ हातीं घेऊनि तुपाची वाटी। नामा लागला श्वानापाठीं। तूप घे गा जगजेठी। कोरडी रोटी कां खासी ॥ २ ॥ तंव श्वान हांसोनि बोलिले। नामया तुज कैसें कळलें। येरु म्हणे खेचरें उपदेशिलें। सर्वांभूतीं विठ्ठल ॥ ३ ॥"

'सर्वांभूतीं विठ्ठल' या निष्ठेच्या बळावरच, विसोबांच्या उपदेशानुसार आपलें सारें आयुष्य संत समागमांत घालवून नामदेवांनीं अखेर 'परेहून परतें' असें जें निरंतर शांतिस्वरूप घर तें गांठलें.

अशांतीच्या खाईंत पडलेली मानव जात आज शांतीसाठीं धडपडत आहे. 'सर्वांभूतीं विठ्ठल' या निष्ठेचा आश्रय केल्यासच ती मिळूं शकेल. अन्यथा भस्मासुर दारीं उभा आहेच.

# “श्रीसत्यनारायणाचें नवें स्वरूप”

गेल्या खेपेच्या अंकासमवेत धाडलेली श्रीसत्यनारायणपूजाविधीची पोथी आमच्या वाचकांस आवडली आणि नवेही बरेच वाचक लाभले यांत आम्हाला समाधान वाटत आहे. अंक व ती पोथी मिळतांच त्यांबाबत आम्हाला गुरुस्थानीं असलेल्या आमच्या ती. दादांनी (डॉ. हरिभाऊ दिवेकर एम्. ए., पी. एच्. डी.) लिहिलेलें पत्र वाचून तर आम्हाला आमच्या सार्‍या श्रमांचें सार्थक झाल्यासारखें वाटलें पत्रांत दादा लिहितात :

“मी माझ्या वार्षिक उत्तर भारताच्या दौर्‍यावरून परवां २-१२-७४ ला परत आलो. तेव्हां जुलै आक्टोबरचा जोड अंक पाहिला ‘सर्वत्र मांगल्य पसरो’ या लेखानें सत्यनारायणास नवें स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. ‘श्रीसत्यनारायणपूजाविधि’ही पोथीही पाहिली.”

आमचा अंक व पोथी मिळाल्यानंतर त्याच्या प्रशंसेपर असंख्य पत्रें आम्हांला वाचकांकडून आलीं व अनेक देणग्याही आल्या. पण या प्रयत्नामुळें श्रीसत्यनारायणाला जें एक नवीन स्वरूप प्राप्त झालें आहे त्याचा इतर कुणीही उल्लेख केलेला नाहीं, एवढेंच नव्हे तर अनेक सद्गृहस्थांनीं समक्ष भेटींत त्या पोथीबद्दल जे प्रशंसोद्गार काढले त्यावरूनही ही गोष्ट कुणाच्या ध्यानीं आलेली दिसून आलें नाहीं.

हल्लीं सत्यनारायणाची पूजा केली जाते त्यांतील देव अत्यंत रागीट, खुनशी व सूड घेणारा असा तत्संबंधीच्या कथेंत दाखविलेला आहे. सत्यनारायणाच्या पूजेचें दर्शन घेण्याचें राहून गेलें वा तिचा प्रसाद चुकून खाल्ला न गेला तर भयंकर आपत्ती कोसळतात असें त्यांत पदोपदीं दाखविलेलें असून नुसतें दर्शन घेतलें असतां व प्रसाद भक्षण केला असतां सर्व प्रकारची सुखसंपदा लाभते असेंही त्यांत म्हटलें आहे. त्यामुळें त्या पूजेला अंधश्रद्धेनें करावयाच्या एका काम्यपूजेचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. तें स्वरूप अजिबात पालटून श्रीसत्यनारायण ही देवता म्हणजे विराट असा जो समाजपुरुष त्याचें तें सगुण स्वरूप असून समाजांत सर्वत्र मांगल्य पसरून सर्वांना सुखशांति लाभावी म्हणून सर्वांनीं मिळून करावयाची अशी एक पूजा असें नवें स्वरूप तिला देणें हेंच ही पूजाविधीची पोथी तयार करण्याचा आमचा उद्देश होता. तो उद्देश या पोथीच्या द्वारें कशा प्रकारें साध्य झाला आहे हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत यावें म्हणून ‘सत्यनारायण, शोध आणि बोध’ हा जुलै १९६७ च्या सद्धर्माच्या अंकांत दिलेला लेख आम्ही पुढें देत आहोंत. त्या लेखाचे वेळीं सद्धर्माची वाचकसंख्या ४००/५०० च होती. आज ती ५००० वर गेली आहे. म्हणजे आमच्या बहुसंख्य वाचकांच्या वाचनीं तो लेख आलेला नाहीं व आतां येण्याचा संभवही नाहीं. म्हणून आमच्या पदरीं लेखाची पुनरावृत्ती केल्याचा दोष फारसा येणार नाहीं. तो लेख वाचून श्रीसत्यनारायण पूजेला नवें स्वरूप प्राप्त करून देण्याचें आमच्या मनांत गेलीं ८-९ वर्षें घोळत आहे तें वाचकांच्या ध्यानांत येईल. दुर्दैवानें कांहीना कांही कारणानें आजवर आम्हीं ती पोथी तयार करूं शकलों नव्हतों. पण आतां तशी पोथी आमच्या हातून प्रसिद्ध झाली आहे आणि वर उल्लेख केलेल्या आमच्या ती. दादांच्या पत्रांतील त्यांच्या उद्गारांवरून ‘सत्यनारायणाला नवें स्वरूप प्राप्त करून देण्याचा’ आमचा उद्देश तद्द्वारां साध्य झालेला आहे असा आम्हांला भरंवसा वाटतो.

मागील अंकांतील 'सर्वत्र मांगल्य पसरो' हा लेख व पुढें दिलेला 'सत्यनारायण, शोध आणि बोध हे दोन्ही लेख वाचल्यावर आमचे वाचकही आमच्याशीं सहमत होतील अशी आशा आहे.

सत्यनारायण पूजेच्या विषयाला हात घालण्याची प्रेरणा आणि तत्संबंधींचे प्रोत्साहनही सुरवातीस म्हणजे ८-९ वर्षांपूर्वी आम्हांस ती. दादांकडून मिळालें होतें. त्यामुळें त्यांच्या पत्रांतील 'सर्वत्र मांगल्य पसरो या लेखानें सत्यनारायणास नवें स्वरूप प्राप्त करून दिलें आहे' या त्यांच्या उल्लेखानें आम्हाला विशेषच आनंद वाटत आहे.

सद्धर्माच्या स्थापनेपासूनच आम्हाला दादांचें मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभलेलें आहे. वरील पत्रही अत्यंत प्रोत्साहनपर व उद्बोधक आहे. त्यांत दादा म्हणतात :

"सेवेशीं श्रुत होय' हें वाचलें. ५००० पैकीं २०६७ लोकांनीं देणगी पाठविली नसतांही आपण रुपये ५००० ची देणगी देऊन 'सद्धर्म' चालवीत आहांत याबद्दल आम्ही वाचकांनी आपले उपकृत रहावयास हवें.

सौ. मालतीबाई गेल्यानंतर पोरक्या झालेल्या सद्धर्मास सांभाळण्यासाठीं ईश्वरानें आपणास आरोग्य द्यावें हाच ९० वर्षे पुरीं झालेल्या ह्या वृद्धाचा आशीर्वाद आहे."

ती. दादांचें वय लक्षांत घ्यावें. ते पुढें लिहितात "आज आतां विशेष कांहीं लिहीत नाहीं. माझी स्वतःची प्रकृती थोडी नरमच आहे. दहाव्या दशकांत प्रवेश झाला तरी फार नरम झाली नाहीं ह्याबद्दल परमेश्वराचे जेवढे उपकार मानावे तेवढे थोडेच आहेत. माझी नित्यप्रार्थनाच असते कीं

यद्यदिच्छसि देवेश, तत्तदेवास्ति मे प्रियम् ।
अहमज्ञो न जानामि, किं वरं, न च किं वरम् ॥

ही प्रार्थना सर्वांनाच उपयुक्त होण्यासारखी आहे. समाजांत सर्वत्र मांगल्याचा प्रसार करण्यासाठीं ती साहाय्यक होईल.

तिच्याबद्दल तद्वत् आजवर दिलेल्या प्रोत्साहन, शुभाशीर्वाद आणि मार्गदर्शन यांबद्दल ती. दादांना मनोमय अभिवादन करून, परमेश्वरानें त्यांना भरपूर आयुरारोग्य द्यावें अशी आम्ही त्याची प्रार्थना करितों. ॐ शुभं भवतु

## "सत्यनारायण : शोध आणि बोध"

"माझ्या माहितींत आमच्या घरीं सत्यनारायणाची पूजा ४७ वर्षांत पाहिली नाहीं. ती ह्या महिन्यांत कोणी चालू केली, तें कळवावें."[1]

१. "रा. सा. विश्वनाथ मंडलिक यांचे चरित्र"—लेखक : न. रा. हवलदार, भाग दुसरा पृष्ठ ११८७.

कट्टर सनातनी म्हणून प्रसिद्ध असलेले रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, ह्यांनीं इ. स. १८८६ त आपल्या कारकुनास लिहिलेल्या एका पत्रांत वरील उल्लेख आहे. त्यावरून त्यांच्या काळीं म्हणजे ८०–९० वर्षांपूर्वी श्रीसत्यनारायणाची पूजा आपल्या प्रांतांत फारशी रूढ नसावी, असें दिसतें.

त्यानंतर आतां तिचा प्रसार फार झपाट्यानें झालेला आहे.

एक काम्यव्रत म्हणजे संतति, संपत्ति, यश वगैरे कामना सिद्ध व्हाव्यात म्हणून ही पूजा वेळप्रसंगीं करण्यांत येतेच; पण आतां तिला एका लहानशा सोहाळ्याचें स्वरूप प्राप्त झालें असून, लग्नानंतर नवदांपत्यांकडून ती करविण्याचा आम प्रघात पडत चालला आहे आणि सार्वजनिकरीत्या तर ती गल्ल्यागल्ल्यांतून, तसेंच गिरण्या व कारखान्यांतून ठिकठिकाणीं करण्यांत येत असलेली दिसून येते.

हल्लीं इतर व्रतवैकल्यें भराभर मागें पडत असतां, ही सत्यनारायणाची पूजा मात्र अधिकाधिक लोकप्रिय होत चालली आहे. कारण एकतर ती गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत कोणाच्याही आटोक्यांतील आहे आणि इतर व्रतांप्रमाणें तिला कोणताही विशिष्ट दिवस अथवा मुहूर्त लागत नसल्यामुळें ती मनांत येईल तेव्हां करतां येते.[२] ती लोकप्रिय होण्याचें आणखी एक कारण म्हणजे आपले आप्तसंबंधी व इतर मित्रमंडळी ह्यांना पूजेला बोलवावें आणि पूजेनंतर कथाश्रवण केल्यावर सर्वांना प्रसाद देऊन 'नृत्यगायनादि कार्यक्रम करावेत'[३] असें त्या पूजेंत विहित असल्यामुळें तो साहजिकच एक छोटासा आनंदोत्सव होऊं शकतो, हें होय. मानव उत्सवप्रिय प्राणी आहे, हें सांगायला नकोच.

ह्या सत्यनारायणाच्या पूजा–समारंभाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत गणपति, लोकपाल व सूर्यादि नवग्रह इत्यादींचें आवाहन–पूजन करण्यांत येऊन, मग श्रीसत्यनारायणाच्या नांवानें एखाद्या लहानशा विष्णूच्या प्रतिमेची अथवा तिच्या अभावीं सुपारीची षोडशोपचार पूजा केली जाते व नंतर प्रसादाचा नैवेद्य दाखविला जातो. दुसऱ्या भागांत सत्यनारायणाच्या कथेची पोथी वाचली जाते व त्यानंतर सर्वांना प्रसाद वाटल्यावर गाण्याची बैठक होते अथवा लोक घरोघर निघून जातात.

सत्यनारायणाच्या पूजेइतकाच त्याची कथा ऐकणें, हा महत्त्वाचा भाग आहे.[४] किंबहुना कथा श्रवण केल्याशिवाय पूजेची पूर्तता होत नसते, असा समज आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे.

सत्यनारायणाची षोडशोपचार पूजा अत्यंत साधी व सुटसुटीत आहे. त्यांत कोणत्याही प्रकारचें होमहवन नसून, त्याला वैदिकमंत्रांची ही खास आवश्यकता नाहीं, किंबहुना, ही पूजा रोजच्या देवाच्या पूजेइतकी सोपी असल्यामुळेंच ती लोकप्रिय

२. ह्या व्रतांत इतर व्रतांप्रमाणें मोठालीं दानें द्यावीं लागत नाहींत, कीं ब्राह्मणभोजनही घालावें लागत नाहीं. सव्वा शेरापासून सव्वाखंडीपर्यंत ऐपतीप्रमाणें हवा तेवढा प्रसाद करण्याची मुभा आहे.

३. सपादं भक्षयेद्भक्त्या नृत्यगीतादिकं चरेत् ॥

—श्री सत्यनारायण पूजा कथा अध्याय १–२३

४. ह्या पूजेच्या सुरुवातीस "श्रीसत्यनारायणपूजनं तत्कथाश्रवणंच करिष्ये।" असा संकल्प केला जातो. तद्वत् तिच्या कथेची फलश्रुति' 'य इदं पठते नित्यं शृणोति मुनिसत्तम । सर्वं नश्यन्ति पापानि सत्यदेवप्रसादतः ॥' (अध्याय ५–१६) अशी दिली आहे.

झाली आहे. ही पूजा सोवळं असल्यानें त्याबद्दलची चर्चा करण्याचें कारण नाहीं.

सत्यनारायण-समारंभाच्या दुसऱ्या भागांत जी पोथी वाचली जाते तिचें नांव 'श्री-सत्यनारायणव्रतपूजाकथा' असें आहे. ती मुळांत संस्कृत असून, तिच्या वाचनाबरोबर तिचा मराठींतून अर्थ ही सांगण्याचा प्रघात आहे. इच्छित फल कोणत्या व्रतानें प्राप्त होतें तें सांगा, अशी नैमिषारण्यांतील शौनकादि ऋषींनीं पुराणें सांगणाऱ्या सूताला विनंति केली असतां, प्रत्यक्ष भगवान् विष्णूनेंच नारदाला सांगितलेलें एक सुलभ व्रत मीं तुम्हांला सांगतों असें म्हणून, सूतानें हें सत्यनारायणाचें व्रत ऋषींना त्या समयीं सांगितलें, अशी ह्या पोथीची सुरवात आहे, आणि तिच्यांत त्या व्रताचें विधान सांगून, तें व्रत केल्यामुळें ज्यांच्या कामना सिद्धीस गेल्या, अशांच्या गोष्टी दिलेल्या आहेत.

सत्यनारायणदेव त्याची पूजा करणारांना तात्काळ सढळ हातानें संपन्न करीत असतो, हें त्या गोष्टींतून अर्थातच पाल्हाळानें सांगितलें आहे. पण त्या बरोबरच, पूजा करण्याचा संकल्प करून जे ती करीत नाहींत, अथवा जे कोणी सत्यनारायणाच्या प्रसादाचा अव्हेर करतात, त्यांच्यावर तो देव कशीं दुर्धर संकटें आणतो, त्यांचीही भडक वर्णनें त्या गोष्टींतून केलीं आहेत. म्हणजे त्यांत देव जसा पराकाष्ठेचा उदार, तसाच तो अत्यंत कोपिष्ठ व सूडबुद्धीचाही दाखविलेला आहे.

ह्या गोष्टी देवादिकांच्या आणि ऋषि-मुनींच्या नांवावर दिलेल्या असल्यामुळें, भोळ्याभाबड्या लोकांना त्या खऱ्या वाटतात. पण त्या बुद्धीला मुळींही पटण्यासारख्या नसल्यानें, विचारी लोकांना, ते सश्रद्ध असले तरी ही, त्या रुचत नाहींत. पण पूजेनंतर पोथी वाचलीच पाहिजे असा दंडक असल्यानें, ती कशीतरी, घाईघाईनें संध्येसारखी वाचली जाते. श्रोते ती ऐकली न ऐकल्यासारखें करतात आणि थोड्याच वेळांत प्रसादाचें वाटप सुरू होऊन, पूजेचें पर्यवसान प्रायः गडबडगुंड्यांत वा लाऊड-स्पीकरवर ऐकविल्या जाणाऱ्या सिने-संगीताच्या रेकॉर्डसच्या जलशांत होत असतें. श्रद्धायुक्त मनानें केलेल्या ह्या पूजेचा अशा प्रकारें विपर्यास होत असल्यानें, त्यासंबंधी थोडी चर्चा करणें आवश्यक आहे.

वर 'निर्देश केलेल्या 'सत्यनारायणव्रत-पूजाकथे'च्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं "इति श्रीस्कंदपुराणे रेवाखंडे" सत्य-नारायणव्रतकथायां...अध्यायः ॥ म्हणजे स्कंदपुराणान्तर्गत रेवाखंडांतील सत्यनारायण व्रतकथेचा ह्या अमुक अमुकावा अध्याय येथें संपला, असें म्हटलेलें आहे. म्हणजे ही कथा स्कंद पुराणांतील रेवाखंडांतून घेतलेली आहे, असें कथा रचणाऱ्याचें म्हणणें आहे. पण मुंबईच्या श्री वेंकटेश्वर प्रेसनें, तसेंच लखनौच्या नवलकिशोर प्रेसनें जें स्कंदपुराण छापलें आहे, त्यांत ही कथा कोठेंही सापडत नाहीं. कलकत्याच्या बंगवासी प्रेसनें छाप-लेल्या स्कंद पुराणांत मात्र ती आहे.[६] पण त्यांत

५. रेवा म्हणजे नर्मदा नदी. रेवाखंडात अथपासून इतिपर्यंत नर्मदानदीचें माहात्म्य वर्णिलेलें आहे.

६. गोरखपूरच्या 'कल्याण' मासिकानें

(पुढें चालू)

सारें रेवाखंड संपून, त्याची फलश्रुति सांगितल्यावर, एवढेंच नव्हे, तर वाचलेल्या पोथीची धूप दीप चंदनानं पूजा करून, ती ब्राह्मणास दान करावी असेंही सांगून टाकल्यावर त्या खंडाच्या अगदीं शेवटीं ती दिलेली आहे, आणि त्यांतील विशेष मौज ही आहे, कीं शेवटच्या ह्या सत्यनारायण व्रतकथेचा आणि आर्षीच्या रेवाखंडाचा कांहींही संबंध नाहीं. साधुवाण्याची नाव बुडाली, त्या नदीचें नुसतें नांव देखील रेवा म्हणजे नर्मदा नाहीं.

अशा स्थितींत बंगवासी प्रेसनें रेवाखंडाची इतिश्रीसुद्धां झाल्यावर, त्याच्या शेवटीं छापलेली सत्यनारायणाची कथा, त्या खंडांत मागाहून घुसडलेली आहे, असेंच म्हणणें प्राप्त आहे.

पांडव वनवासांत असतां नर्मदाकाठीं मार्कण्डेय ऋषीच्या आश्रमीं आले. तेथें मार्कण्डेयानें त्यांना हें रेवाखंड म्हणजे नर्मदा माहात्म्य सांगितलें, असें त्यांत सुरुवातीस म्हटलें असून, तें ऐकल्यावर पांडव नर्मदा काठच्या तीर्थांची यात्रा करण्यास निघून गेले, असें त्याच्या शेवटीं म्हटलें आहे. नर्मदामाहात्म्य ऐकून पांडव अशा प्रकारें तीर्थाटनासाठीं निघून गेल्यावर, त्यानंतर लगेच, नैमिषारण्यांतील ऋषींना सूतानें नर्मदेशीं कांहींही संबंध नसलेलें हें सत्यनारायणाचें व्रत सांगण्याचें कांहींच प्रयोजन नव्हतें. ऋषि-मुनि, त्यांचे आश्रम, कौरवपांडव, इत्यादींनीं युक्त असलेल्या रेवाखंडांतील प्राचीन वातावरणाशीं ह्या सत्यनारायणाच्या कथेंतील ब्राह्मण, मोळीविक्या, साधुवाणी ह्यांनीं भरलेलें आधुनिक वातावरण अगदींच विसंगत नाहीं का? ह्या दृष्टीनें विचार केला असतां, बंगवासी प्रेसच्या आवृत्तींतील ही सत्यनारायणाची कथा त्यांत प्रक्षिप्त आहे, असें कोणालाही मान्य करावें लागेल.

रेवाखंडाच्या कोणत्याही भागाशीं तुलना करतां, ह्या सत्यनारायण व्रत-कथेची रचना, भाषा व एकंदर वर्णनशैली, उघड उघड आधुनिक असल्याचें दिसून येतें. त्यावरून ती अगदीं अलीकडच्या काळांत रचली गेली आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

भारत इतिहास-संशोधन मंडळ, पुणें ह्यांच्या संग्रहीं ज्या हस्तलिखित पोथ्या आहेत, त्यांत सन १८३३ सालीं लिहिलेली सत्यनारायणाची एक पोथी आहे. त्याहून जुनी प्रत अजून तरी सापडल्याचें ऐकिवांत नाहीं. पेशव्यांच्या दप्तरांत धर्मादाय खातीं जे खर्च पडलेले दाखविले आहेत, त्यांत सत्यनारायणाच्या पूजेसाठीं खर्च पडल्याचें कोठेंही दिसून येत नाहीं. त्यावरून ही पूजा निदान महाराष्ट्रांत तरी पेशवाईनंतर चालू झाली, असें म्हणतां येईल.[७] रावसाहेब

---

(मागील पानावरून पुढे चालू.)

जो 'संक्षिप्त' स्कंदपुराणांक, (जानेवारी १९५१) काढला आहे, त्यांत त्यांनीं ही सत्यनारायण व्रतकथा रेवाखंडाच्या अगदीं शेवटीं दिली असून, 'यह सत्यनारायणव्रतकथा बंगवासी प्रेस, कलकत्ता से प्रकाशित बंगला संस्करण के रेवाखंड से अनुवादित है।' अशी टीप शेवटच्या पानावर दिली आहे.

७. श्री. ना. चापेकर ह्यांनीं 'अमृत' मासिकाच्या ऑक्टोबर १९५४ च्या अंकांत ह्यासंबंधीं आणखी कांहीं पुरावा दिला आहे.

मंडलिकांच्या काळीं, म्हणजे ८०-९० वर्षां-पूर्वी, ती फारच कमी प्रमाणांत प्रचारांत होती, हें आपण सुरवातीस पाहिलें आहेच.

कलकत्त्याच्या एशिआटिक सोसायटीच्या संग्रहीं ज्या हस्तलिखित पोथ्या आहेत, त्यांत तीन पोथ्या 'सत्यनारायणकथा' ह्या शीर्षकाच्या आहेत. तीनही पोथ्या गेल्या शंभर-सव्वाशें वर्षांच्या म्हणजे अगदीं अलीकडच्या आहेत. पण मौज ही आहे, कीं त्यांतील दोन कथांत (क्रमांक ३९१०, ३९११) त्या स्कंद पुराणाच्या रेवाखंडांतून घेतलेल्या असल्याचा उल्लेख आहे, तर तिसऱ्या पोथींत (क्रमांक ३९१२) ती पद्म पुराणाच्या (!) रेवाखंडांतून घेतली असल्याचें म्हटलें आहे!

ह्या तिन्ही पोथ्यांची श्लोकसंख्या वेगवेगळी असून, एकीचा मेळ दुसरीशीं बसत नाहीं.

ह्या संग्रहांतच 'सत्यनारायणव्रतकथा' ह्या शीर्षकाची आणखी एक (ताडपत्रावरील) पोथी आहे. (क्रमांक ३३७०) तीही७०-८० वर्षांमागची म्हणजे अगदीं अलीकडे लिहिलेली आहे. तिची इतिश्री पुढीलप्रमाणें आहे—

"इति श्रीमहाभारते इतिहाससमुच्चये साधुचरितवर्णने सत्यनारायणव्रतनाम चतुर्थोऽध्यायः" म्हणजे ही कथा 'इतिहास-समुच्चय' नावाच्या महाभारताच्या गोष्टवाऱ्यावरून घेतलेली आहे, असें ती लिहिणाराचें म्हणणें आहे.

खुद्द महाभारतांत सत्यनारायणाची कथा कोठेंही आढळून येत नाहीं मग ती त्याच्या गोष्टवाऱ्यांत कशी आली. देव जाणे!

ह्या विषयाची चर्चा करतानां कलकत्त्याचे महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री ह्यांनीं सत्यनारायणाची ही कथा अगदीं आधुनिक आहे, असें आपलें स्पष्ट मत दिलें आहे. त्यांचें तर म्हणणें आहे, की सत्यनारायणाच्या पूजेचें मूळ मुसलमानी आहे. मुळांत तिला 'सत्यपिरेर पूजा'८ म्हणजे सत्यपीराची पूजा. असें नांव होतें आणि अजूनही (बंगालमध्यें) बऱ्याच ठिकाणीं तें चालू आहे. ह्यावरून असें दिसतें, कीं हिंदूंनीं कोणा एका सत्य पीराला आपलासा करून त्यास सत्यनारायण हें हिंदू नांव दिलें असावें.

विष्णुसहस्रनामांत विष्णूचीं हजार नांवें दिली आहेत. पण त्यांत त्याला सत्यनारायण ह्या नांवानें कोठेंही संबोधिलेलें नाहीं.

सत्यनारायणाच्या कथेंतील कांहीं उल्लेखांवरून, ती बंगालमध्यें रचली गेली असावी; असें दिसतें. उदाहरणार्थ, प्रसादासाठीं गव्हाचा रवा न मिळेल, तर तांदुळाचा रवा घ्यावा९" असें तिच्यांत म्हटलें आहे.

---

८. "It is a very modern work. The worship of Satya-Narayan has a Muhammadan origin. It was originally and even now in many places, called Satya-Pirer Puja..." —A descriptive catalogue of Sanskrit manuscripts in the Government collection under the care of the Asiatic Society of Bengal, Mahamohopadhyaya Haraprasad Shastri, Vol. V, Preface, page LXV.

९. रंभाफलंघृतं क्षीरं गोधूमस्य च चूर्णकम् ।
अभावे शालिचूर्णं वा शर्करां च गुडं तथा ॥

—सत्यनारायणव्रतपूजाकथा
अध्याय १,२०–२१

बंगालमध्यें पूर्वी गहूं मिळत नसल्यामुळें तांदुळाचा रवा घ्यावा लागत असे. महाराष्ट्रांत आपण तांदुळाच्या रव्याचा शिरा कधीं करीत नसतों. शिवाय ह्या कथेंतील साधुवाणी व्यापारासाठीं आपला माल नौकेंत घालून नदीमार्गानें रत्नसारनगरीं जातो; असें त्यांत म्हटलें आहे. बंगाल्यात बराचसा व्यापार अजूनही नदीमार्गानें नौकेंतून करावा लागतो तसेंच अंगध्वज हे पाचव्या अध्यायांतील राजाचें नांव बंगालकडील आहे. अंग म्हणजे जुन्या काळचा पश्चिम बंगाल हें सर्वश्रुतच आहे.

सत्यनारायणाच्या पूजेच्यें मूळ कांहींही असो आणि तिची कथा कोणत्याही प्रांतांत रचली गेली असो, ती अगदीं अलिकडच्या काळांत किंबहुना, गेल्या शे-सव्वाशें वर्षांत रचली गेलेली आहे, हें अगदीं उघड आहे.

आणि ती कथा ज्यानें रचली तो महाभाग अत्यंत बुद्धिमान असला पाहिजे, ह्यांत शंका नाहीं. एरव्हीं आपली कथा प्रत्यक्ष भगवान विष्णूच्याच मुखीं घालून ती 'स्कंदपुराणं रेवाखंडे' आहे, असें बेधडकपणें म्हणण्याचें धाडस त्यानें केलें नसतें.

आपली ही कथा लोकांच्या गळीं उतरविण्यासाठीं ह्या महाभागानें जी जोडगोळी[१०] उपयोगांत आणली आहे, त्यावरून तो भोळ्याभाबड्या जनांच्या कमकुवत मनःस्थितीचा उत्तम जाणकार असावा, असें म्हटलें पाहिजे. एकीकडे एक दरिद्री ब्राह्मण व मोळीविक्या ह्यांच्यासारख्यांच्या अत्यंत रसाळ गोष्टी कथेंत घालून, पूजा करणारांना सत्यनारायण देव कसें तात्काळ संपन्न करतो, हें त्यानें दाखविलें आहे. तर लगेच दुसरीकडे साधुवाणी व अंगध्वज राजा ह्यांच्या भडक गोष्टी त्यांत घालून, अवमान झाला असतां सत्यनारायण देव तो करणारांना कसा रातोरात धुळीस मिळवितो, हें दाखविलें आहे.

म्हणजे एका बाजूनें सत्यनारायणाची पूजा करणारांना ह्या महाभागानें मधाचें बोट लाविलें आहे, तर दुसऱ्या बाजूनें ती टाळणाराच्या मनांत त्यानें तिच्याबद्दल पुरती दहशत बसवली आहे.

पूजा केली असतां सत्यनारायण देव जर सर्व कांहीं देतो, तर ती करून, त्याच्याकडून हवें तें मागून घेण्याचें कोण मनांत आणणार नाहीं! आणि पूजा करण्याचा संकल्प करून, ती न केली असतां, सत्यनारायण देव

१०. हल्लींच्या काळीं कोणाला आपल्या एखाद्या बुवा अथवा बाबांचें प्रस्थ माजवायचें असल्यास, तो त्यांच्या नांवानें ओळखीच्या लोकांना निनांवी पत्रें लिहून, तुम्ही ह्या पत्राची नक्कल करून ती दहाजणांना धाडा, तसें केलेंत तर त्यांच्या कृपाप्रसादानें तुमच्या सर्व इच्छा तृप्त होतील, पण न कराल, तर तुमचा मुलगा मरेल अथवा तशीच एखादी आपत्ति तुमच्यावर येईल, असें कळवीत असतो. बिचारे भोळेभाबडे लोक अशीं पत्रें आलीं, कीं घाबरून जातात व मुकाट्यानें त्या पत्रांत सांगितल्याप्रमाणें दहा पत्रें लिहून टाकतात. परिणामी बुवा-बाबांचें प्रस्थ हमखास वाढतें. सत्यनारायणाची कथा रचणाऱ्यानें अशाच प्रकारचें तंत्र (technique) उपयोगांत आणलें आहे, असें म्हणतां येईल.

कोपिष्ठ होऊन धुळीस मिळवितो, तर मग ती पुढें ढकलून, त्याचा कोप होण्याचा धोका कोण पत्करील? सत्यनारायणाचा प्रसाद न घेतल्यामुळें जर नवरा नावेसह बुडतो आणि १०० पुत्र एकाएकीं मरण पावतात, तर त्या प्रसादाचा अव्हेर करण्याचें धाडस उगाच कोण करील?

अशा स्थितींत भोळ्याभावड्या लोकांनीं ह्या पूजेचा मुकाट्याने अंगिकार करावा, हें अगदीं साहजिक आहे. सत्यनारायणपूजेचा गेल्या शें-सव्वाशें वर्षांत जो झपाट्यानें प्रचार झाला व अजूनही होत आहे, त्याचें कारण ह्या कथेनें लोकांना एका बाजूनें कामनापूर्तीचें मधाचें बोट लाविलें आहे व दुसऱ्या बाजूनें त्यांच्या मनांत सत्यनारायण देवाबद्दल भयंकर दहशत बसविली आहे, हेंच होय.

आणि त्यामुळें त्या पूजेबरोबरच अनिष्ट अंधश्रद्धेची वाढही झपाट्यानें झालेली आहे.

पण ह्यांत सत्यनारायणाच्या पूजेचा अर्थाअर्थी काहींही दोष नाहीं. सारा दोष ती पूजा लोकांच्या गळीं उतरविण्यासाठीं रचलेल्या त्या अवास्तव व धादान्त खोट्या कथेचा आहे.

सत्यनारायणाची पूजा खरोखर साधी व सुटसुटीत आहे. गरीब व श्रीमंत अशा सर्वांच्या ती आटोक्यांतील असून, कोणत्याही दिवशीं व केव्हांही ती करतां येते. तिच्या निमित्तानें आप्तेष्ट व स्नेही-सोबती एकत्र येतात, सर्वांना आनंद लुटतां येतो. समाजाला अशा पूजा हव्या आहेत. त्यांची वाढ झालीच पाहिजे.

कोणत्याही पूजेचा खरा उद्देश आस्तिक्य बुद्धि अतएव ईश्वरनिष्ठा जागृत करून, व्यक्तीचा आत्मविश्वास बळावणें हा असतो. पण दुर्दैवानें ह्या सत्यनारायणाच्या पूजेचा परिणाम, तिच्याशीं निगडित असलेल्या कथेपायीं, अगदीं उलट दिशेनें होत असून, समाजांत अंधश्रद्धा व व्यक्तीचा भ्याडपणा, हीं वाढत आहेत. "तूं माझी माउली, मी तो तुझा तान्हा" असें म्हणून ज्याला प्रेमानें आळवायचें, त्या देवाबद्दल कोणाच्या मनांत दहशत असणें इष्ट आहे का? जर एखाद्या कथेमुळें लोकांच्या मनांत देवाबद्दल अशा प्रकारच्या विकृत भावना निर्माण होत असतील, तर ती कथा त्याज्य नाहीं का?

अश्रद्धा व अंधश्रद्धा ह्यांच्या कैचींत सापडल्यामुळें सध्या समाज गोंधळलेल्या मनःस्थितींत आहे. ह्यांत राष्ट्राला धोका आहे. तो टाळण्यासाठीं आस्तिक्यबुद्धीला आवाहन करून व्यक्तीनें आपला आत्मविश्वास वाढविणें अत्यंत निकडीचें आहे. त्यासाठीं सत्यनारायणाची पूजा अत्यंत उपयुक्त होईल.

पण ती तशी खरोखरच व्हायची असेल, तर त्या पूजेभोंवतीं निर्माण झालेलें अंधश्रद्धेचें धुकें नाहींसें करण्यासाठीं त्या पूजेनंतर वाचली जाणारी ही प्रचलित सत्यनारायणाची कथा प्रथम बाजूला ठेवली पाहिजे व आस्तिक्यबुद्धि जागृत करून, व्यक्तीचा आत्मविश्वास वाढविणारी दुसरी एखादी सोज्वळ कथा तिच्या जागीं वाचली पाहिजे.

तशा प्रकारची एखादी प्रभावी कथा रचण्याची सद्बुद्धि सत्यनारायण देव एखाद्या विद्वान् मुद्दाला देवो, हेंच आमचें त्याच्याजवळ मागणें आहे.

॥ ॐ तथास्तु ॥

# स्वार्थाचा अभाव तेथें समृद्धि

उपमन्यु बालवयाचा होता. घरांत दारिद्र्य म्हणून त्याच्या आईनें त्याला आपल्या भावाच्या म्हणजे त्याच्या मामाच्या घरीं शिक्षणासाठीं म्हणून ठेविलें होतें.

मामा सधन होता, गोठ्यांत असंख्य गाई होत्या. त्यामुळें घरांत नेहमी भरपूर दूध असे. पण मामी खाष्ट होती. स्वतःच्या मुलांना तेवढें मनसुराद दूध देई; उपमन्यूला मात्र कधीं दिलेंच तर एखादी वाटी अर्धी वाटीभर देई. आपल्यालाही मामाच्या मुलांप्रमाणें भरपूर दूध मिळावें असें त्याला वाटे; पण तो तें मागणार कुणाजवळ? तो पडला तेथें आश्रितासारखा राहिलेला!

नंतर कांहीं दिवसांनीं सुटींत तो आपल्या घरीं आईपाशीं राहायला आला असतां एके दिवशीं त्याला मामाच्या घरच्या दुधाची आठवण झाली आणि त्यानें त्यासाठीं आई-जवळ हट्ट धरला. आईनें त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण उप-मन्यु ऐकेना आई म्हणाली, "बाळा, आपण निर्धन माणसें. आपल्याजवळ कुठली गाय आणि कुठलें दूध असणार? तुझे वडील तुला सोडून अकालीं देवाघरीं गेले. आपण कसेतरी दिवस कंठत आहोंत. तूं मोठा हो, पैसे मिळव. मग आपण गाई घेऊं नंतर घरांत दूधच दूध होईल बरं."

पण उपमन्यु कांहीं केल्या दुधाचा हट्ट सोडीना. तेव्हां मग त्याच्या आईला एक कल्पना सुचली. तिच्यापाशीं घरांत कसलेसें थोडें बी होतें. ती जड अंतःकरणानें आंत गेली आणि त्यांतले थोडेसें बी पाट्यावर वांटून तिनें त्याची बारीक पूड केली आणि मग एका भांड्यांत पाणी घेऊन तिनें ती त्यांत कालवली. तेव्हां तें अगदीं दुधासारखें झालें. तें घेऊन ती उपमन्यु रडत बसला होता तेथें आली आणि त्याला म्हणाली, "बाळा रडूं नकोस. हें बघ, मी तुझ्यासाठीं थोडें दूध आणलें आहे. पी हें."

त्या दुधाची वाटी तोंडाला लावतांच उपमन्यु आईला म्हणाला, "आई, मामाच्या इथल्यासारखं हें दूध नाहीं. तूं दुसरंच कांहीं तरी देऊन मला फसवीत आहेस. मला नको हें तुझं दूध. आणि असें म्हणून उपमन्यु पुन्हा दुधासाठीं आक्रोश करूं लागला. आईच्या उरांत भडभडून आलें. तीही ओक्साबोक्शीं रडूं लागली. अनाथ अबला, दुसरं काय काय करणार? डोळ्यांतून भरपूर पाणी गेल्यावर तिला बरेंचसें हलकें वाटलें. मग ती उपमन्यूला म्हणाली, "बाळा, तुझ्या नशिबीं दूध नाहीं, त्याला मी तरी काय करूं?" आणि असें म्हणून ती पुन्हा रडूं लागली.

तेव्हां उपमन्यु एकदम तिला म्हणाला, "आई, काय केलं म्हणजे मला दूध मिळेल? माझं नशीब कशानें बदलेल?"

आई थोडीशी शांत होऊन म्हणाली, 'बाळा, शिवाची भक्ति कर. देता देवविता, सर्व कांहीं तोच आहे. त्याला शरण जा. तोच स्वतः खरोखरी निष्काम असल्यानें तुझी कामना पूर्ण करूं शकेल."

हें ऐकतांच उपमन्यूचा चेहरा प्रफुल्लित झाला. तो उत्साहानें आईला म्हणाला, "तर मग आई, हा मी निघालोंच. तपश्चर्या करून शिवाला प्रसन्न करून घेतल्याशिवाय मी अन्नालाही शिवणार नाहीं."

मुलाचें हें भाषण ऐकून आईला धन्य

वाटलें. त्याला पोटाशी घेऊन कुरवाळीत ती सद्‌गदित होऊन म्हणाली, "वडिलांना शोभणाराच माझा बाळ आहे! बाळा तुला उदंड आयुष्य असो. तुझ्या तपश्चर्येंत जर कधीं कांहीं विघ्न आलं, तर ही विभूति जवळ असू दे. तिचा त्या वेळीं उपयोग कर. तुझ्या वडिलांनीं अघोर मंत्रांनीं मंत्रित करून ती मला दिली होती. ही संभाळून ठेव." आणि असें म्हणून तिनें कनवटीला असलेली एक लहानशी भस्माची पुडी उपमन्यूला दिली.

मातेची आज्ञा घेऊन उपमन्यु जो निघाला तो सरळ हिमालयांत निघून गेला. जेथें त्यानें शिवाची अत्यंत कडक अशी उपासना सुरू केली. त्यामुळें त्याची परीक्षा पाहण्यासाठीं भगवान् शंकर इंद्राचें रूप धारण करून ऐरावतावर बसून तेथें आले. नंदी ऐरावत बनला होता आणि पार्वती इंद्राची शची बनली होती.

इंद्ररूपी शिव उपमन्यूला म्हणाले, "बाळ उपमन्यु, किती लहान वयाचा तूं आहेस. तुझी ही खडतर तपश्चर्या पाहून मीं प्रसन्न झालों आहें. तर सांग, तुझी काय इच्छा आहे. मीं ती तृप्त करीन."

ऐरावतावर शचीसहित बसलेल्या त्या इंद्राला पाहून उपमन्यूनें त्याला वंदन केलें व म्हणाला, "देवेंद्रा, मीं शिवाची उपासना करीत आहें. मला जें कांहीं हवें आहे तें देण्याला तोच काय तो एक समर्थ आहे असं मला माझ्या आईनं सांगितलं आहे. मीं इतर कुणापुढेंही हात पसरणार नाहीं."

हें ऐकून इंद्र म्हणाला, "उपमन्यु, तूं वेडा आहेस. माझी सत्ता किती आहे, तें तूं जाणत नाहींस असं दिसतं. अरे, मीं देवांचा राजा आहें, प्रत्यक्ष स्वर्गाचा मालक आहें, माझ्यापुढें तूं त्या भणंगभिकारी शिवाची थोरवी ती काय सांगतोस? भूतपिशाचांच्या समवेत स्मशानांत वास करणारा तो तुला काय देणार?"

उपमन्यु थोडासा चिडूनच म्हणाला, "शंकर स्वतः निष्काम आहे. आणि म्हणूनच मला काय हवं तें तो देऊं शकेल. इंद्रा, ज्यांच्या स्वतःच्या कामनावासना तृप्त झालेल्या नाहींत असे तुझ्यासारखे देव मला किती पुरे पडतील?"

हें ऐकूनही इंद्रानें शंकराची निर्भर्त्सना चालूच ठेविली. ही ऐकून उपमन्यूचें पित्त खवळलें. तो सात्त्विक संतापानें इंद्राला म्हणाला, "इंद्रा, मुकाट्यानें आपल्या वाटेला लाग. भगवान शंकर हें माझं परम दैवत आहे. त्याची केलेली निंदा मीं सहन करणार नाहीं. तुला त्याचा बदला चाखा लागेल."

इंद्र विकट हास्य करून म्हणाला, "वेड्या तूं माझं पारिपत्य काय करणार? उपमन्यु, प्रत्यक्ष देवेंद्राचा त्याच्या तोंडावर असा अपमान केल्यानंतर, तूं जिवंत तरी राहशील का?"

उपमन्यु म्हणाला, "कशाला मला मरणाची भीति दाखवतोस? हा पाहा, जठराग्नि तयार करून त्यांत स्वतःची आहुति देण्याला मीं तयार आहें. मात्र तत्पूर्वी माझ्या आईनें दिलेल्या या अघोर अस्त्राचा प्रभाव तुला पाहावा लागेल. सांभाळ आपल्याला."

असें म्हणून उपमन्यूनें आपल्याजवळ असलेलें तें विभूतिअस्त्र इंद्रावर फेकलें आणि जठराग्नि प्रदीप्त करण्यासाठीं स्वतः पद्मासन घालून डोळे मिटले.

उपमन्यूची ती अनन्य भक्ति पाहून इंद्राचें रूप टाकून देऊन शंकर लगेच त्याच्यापुढें प्रकट झाले. ऐरावताचा पुन्हा नंदी झाला. आणि शचीच्या जागीं पार्वती प्रकट झाली. उपमन्यूनें सोडलेलें तें विभूतिअस्त्र नंदीनें अलग झेलून घेतलें आणि शंकरानें पुढें होऊन उपमन्यूच्या जठराग्नीचें स्वतः शमन केलें.

जठराग्नि शांत होतांच हा काय प्रकार आहे म्हणून उपमन्यूनें आश्चर्यानें डोळे उघडले. समोर पाहतो तों नंदीवर बसलेले प्रत्यक्ष भगवान शंकर आणि पार्वती!

त्यांना पाहतांच उपमन्यूचें हृदय भक्तिरसानें उचंबळून आलें आणि त्यांच्यापुढें दंडवत घालून त्यानें त्यांचें स्तवन सुरू केलें. तो म्हणाला,

"वन्दे देवमुमापतिं सुरगुरुं वन्दे जगत्कारणम्।
वन्दे पन्नगभूषणं मृगधरं वन्दे पशूनां पतिम्।
वन्दे सूर्यशशांकवह्निनयनं वन्दे मुकुंदप्रियम्।
वन्दे भक्तजनाश्रयंच वरदं वन्दे शिवं शंकरम्।

उपमन्यूनें केलेलें स्तवन ऐकून शंकरानें त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला आणि त्याला ते म्हणाले, "वत्सा उपमन्यु, तुझी अढळ भक्ति पाहून मी प्रसन्न झालों आहें. सांग, तुला कोणता वर हवा!"

उपमन्यु हात जोडून म्हणाला, "भगवन् आपलं दर्शन झाल्यानंतर मला अधिक तें काय हवें असणार? मला आतां कसलीही कामना उरलेली नाहीं. मीं संतुष्ट आहें. माझी आपणावरील भक्ति अढळ राहावी हाच मला वर द्यावा."

शंकर म्हणाले, "शाबास उपमन्यु, तुझ्या भक्तींत इतःपर कोणीही व्यत्यय आणणार नाहीं असा माझा तुला वर आहे. पण बाळा, आपल्याला दूध मिळावं म्हणून ना तूं ही तपश्चर्या आरंभिली होतीस? मग तसा वर मागून घे."

उपमन्यु म्हणाला, "भगवान् आतां त्या दुधाचीही कामना उरलेली नाहीं. पण आपण म्हणतात्च म्हणून वर मागतों. महेश्वरा, माझ्यासारखीं जीं असंख्य दरिद्री मुलें आज भूतलावर आहेत त्यांना पिण्यासाठीं भरपूर दूध मिळावं म्हणून पृथ्वीवर आपण एक क्षीरसागर निर्माण करावा अशी माझी आपल्या चरणीं प्रार्थना आहे."

उपमन्यूची व्यापक बुद्धि पाहून शंकराला समाधान वाटलें आणि त्याला जवळ घेऊन कुरवाळित ते म्हणाले, "तथास्तु बाळा, तुझ्या इच्छेप्रमाणें पृथ्वीवर क्षीरसागर निर्माण होईल. तुझें कल्याण असो. तूं असशील तेथें सदैव शिवाचा वास राहील, मांगल्य असेल." आणि असें म्हणून भगवान शंकर तेथून अंतर्धान पावले.

शंकराच्या दर्शनानें उपमन्यूला कृतकृत्य वाटलें. मुदित अंतःकरणानें तो तेथून निघाला आणि सरळ आपल्या घरीं आईकडे आला व त्यानें तिला सारा वृत्तांत सांगितला. तो ऐकून आईचा आनंद गगनांत मावेनासा झाला तर त्यांत नवल तें काय!

'ॐ नमः शिवाय' असें अगदीं सहज स्फूर्तीनें तिच्या तोंडून निघालं आणि शिवाचें स्मरण करीत तिनें हात जोडले.

—शिवपुराण वा. सं पूर्वखंड, अध्याय ३३-३४ च्या आधारें.

ही कथा अत्यंत सूचक व अर्थवाही आहे. उपमन्यूनें खडतर तपश्चर्या करून शिवाला प्रसन्न केलें. प्रत्यक्ष शिवाचेंच दर्शन झाल्यावर मुळांतील त्याची दुधाची स्वार्थी वासना त्याला गेली आणि शिवानें वर माग म्हणून आग्रहानें म्हटलें असतां केवळ स्वतःसाठींच दूध न मागतां भूतलावरील सर्वच मुलांना तें भरपूर मिळावें म्हणून शंकराकडून त्यानें क्षीरसागर मागून घेतला. त्यांतील रहस्य शिवाच्या दर्शनानें त्याची बुद्धि आतां विशाल बनली होती आणि त्याचे ठायीं स्वार्थ असा मुळींही उरला नव्हता, हेंच होय. उपमन्यूच्या म्हणण्याप्रमाणे शंकरानें पृथ्वीवर क्षीरसागर तर निर्माण केलाच पण जेथें उपमन्यु तेथें शिवाचा वासही सदैव असेल असाही आणखी एक वर त्याला आपण होऊन दिला. जेथें बुद्धीची व्यापकता आणि स्वार्थाचा अभाव तेथें समृद्धि आणि शिव अतएव मांगल्य हीं दोन्हीही असणारच.

आज भूतलावर सर्वत्र दैन्य आणि अमंगलता पसरलीं आहेत त्याचें कारण आपण अत्यंत स्वार्थी बनलों आहोंत आणि मनानें पराकाष्ठेचे कोते झालों आहोंत, हेंच होय.

विचारवंतांचे डोळे अजून तरी उघडतील का !

# तरच भविष्यकाल उज्ज्वल

"The past is our Foundation, The present our material, the future our aim and summit"

—Shri Arvind, National Education.

"भूतकाळ हा आपला पाया, वर्तमान काळ ही साधनसामग्री आणि भविष्यकाळ हें आपण गांठावयाचें शिखर आहे."

१९०८ च्या सुमारास स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं जो लढा सुरू केला गेला, त्या वेळीं स्वतंत्र-भारताची भावी पिढी तयार करण्याबाबतची शिक्षणयोजना कशी असावी याबद्दल श्री. अरविंदांनीं काढलेले वरील उद्गार आहेत.

स्वातंत्र्य मिळून आतां सत्तावीस वर्षें होत आलीं. तरी आज शिक्षणाबाबत आपण काय करीत आहोंत ? भूतकाळाच्या पायावर भविष्यकाळाची इमारत उभारणें तर बाजूलाच राहिलें, पण शिक्षणक्रम आंखतांना भूतकाळाला शक्यतों अजिबात गाडून टाकण्याचे पद्धतशीर प्रयत्न चालू आहेत !

पण भूतकाळ असा गाडून कधीं नाहींसा होणारा आहे का ? कुणाला तो हवा असो कीं नको असो; तो अस्तित्वांत आहे आणि असणारच.

आणि तसें म्हटलें तर आज ज्याची तुम्ही इतकी वडेजावी करत आहांत तो वर्तमान काळही, पाहतां पाहतां भूतकाळ होत आहे, हें विसरूं नका.

तेव्हां म्हणजे, आपल्या भूतकाळांत मान खालीं घालण्यासारखें कांहींच नाहीं. त्याचा नीट अभ्यास करा आणि त्यांत खरोखरी झालेल्या चुका पुन्हा आपल्या हातून होणार नाहींत त्याची काळजी घ्या. तशानेंच भविष्यकाळ उज्ज्वल होईल.

# ‘ये, सिंहासन तुझ्यासाठीं मोकळें आहे.’

ऋतुध्वज राजाचा मुलगा अलर्क हा औदार्याबद्दल पुराणवाङ्मयांत प्रसिद्ध आहे. एकदां एक गरीब ब्राह्मण त्याचेकडे आला असतां, अलर्कानें त्याचें यथोचितपणें आदरातिथ्य करून त्याला म्हटलें, “द्विजराज, आपली काय अपेक्षा आहे तें सांगा. आपण मागाल तें देण्याचा मी प्रयत्न करीन.

त्यावर ब्राह्मण म्हणाला, “राजा तूं देशील पण तें पाहायला मला दृष्टि हवी ना? मी जन्मांध आहें. देणारच असशील तर मला दृष्टि दे. दुसरें कांहीं नको.”

अलर्कानें कसलाही विचार न करतां लगेच आपले स्वतःचे डोळे काढून त्या अतिथीस दिले!

हा अलर्क उत्तम राजा होता. न्यायनीतीनें राज्य करी; प्रजेची भरभराट होती; लोक सुखी होते. अशा स्थितींत त्याचा मोठा भाऊ सुबाहु यानें राज्यतृष्णेपायीं त्याच्यावर एकाएकीं स्वारी केली. तें समजतांच त्यानें भावाला निरोप धाडला : दादा कशाला या उठाठेवींत पडलास ! तुला माझें राज्य हवें आहे ना ? तर ये, माझें सिंहासन तुझ्यासाठीं मोकळं आहे. तुझं स्वागत असो.”

आणि त्याप्रमाणें लगेच आपलें राज्य भावाच्या स्वाधीन करून तो वैराग्यवृत्तींत वनांत तपश्चर्येसाठीं निघून गेला!

अलर्काच्या ह्या वृत्तीचें रहस्य त्याची आई राणी मदालसा हिनें बाल्यपणींच त्याच्यावर केलेल्या संस्कारांत आहे. मदालसा ही आत्मानंदाचा अनुभव घेणारी एक ब्रह्मवेत्ती योगिनी म्हणून प्रसिद्ध आहे.

बाळ अलर्काला पाळण्यांत घालून झोके देतांना ती त्याला म्हणे :

“शुद्धो ऽसि बुद्धो ऽसि निरञ्जनो ऽसि
संसारमायापरिवर्जितो ऽसि” ॥

“बाळा तूं शुद्ध बुद्ध आणि निष्पाप आहेस. संसारमायेचा तुला नुसता विटाळही न होवो.

मातेकडून हें बाळकडू मिळाल्यावर अलर्क पुढें विरक्त बनला आणि आत्मानंदीं रत होण्यासाठीं अखेर वनांत निघून गेला. तर त्यांत नवल नाहीं.

बालपणीं मनावर घडलेले संस्कार अत्यंत खोल आणि चिरायु असतात.

—मार्कंडेय पुराण, अध्याय २–३–४०

मदालसेवर ज्ञानेश्वरांचंही एक प्रकरण आहे. सकल संत गाथा भाग १, पृ. ८९–१०८ पाहावीं.

## क्षमस्व

परिस्थितीच्या प्रतिकूलतेपायीं हा अंकही आपल्या हातीं पडण्यास उशीर होत आहे. आमचा त्याला नाइलाज आहे. पुढील अंक वेळींच प्रसिद्ध करण्याची कोशीस करूं. पण विलंब झाल्यास वाचकांनीं आम्हास सहानुभूतीपूर्वक संभाळून घ्यावें ही नम्र विनंती.

## ध्यानीं असावें कीं—

१ देणगी पाठवितांना आपला क्रमांक देणें आवश्यक आहे. हा क्रमांक आपणास आलेल्या पाकिटावर आपल्या नांवामागें असतो.

२ पूर्ण नांव व पत्ता स्पष्ट देणें आवश्यक.

३ प्रथम देणगी ज्या नांवानें दिली असेल त्या नांवाचा उल्लेख देणगी देतांना करावा.

## संतवचनांचा मथितार्थ....

करूनी हरिकीर्तन ।
तेथें सेविती जे अन्न ॥ १ ॥
ऐसे अभागी खळ ।
परम चांडाळ कलियुगीं ॥ २ ॥

—एकनाथ, स. संतगाथा भाग २ पृ. १०२

जेथें कीर्तन करावें ।
तेथें अन्न न सेवावें ॥ १ ॥
बुका लावूं नये भाळां ।
माळा घालूं नये गळा ॥ २ ॥
तट्टावृषभासी दाणा ।
तृण मागों नये जाणा ॥ ३ ॥
तुका म्हणे द्रव्य घेती ।
देती तेही अधो जाती ॥ ४ ॥

—तुकाराम, स. संतगाथा, भा. २ पृ. १०२

कथाकीर्तनकारांची दृष्टी स्वतःची तुंबडी भरण्याकडे असतां कामा नये, असा वरील संत वचनांचा मथितार्थ आहे.

आणि खरेंच आहे. लाभावर दृष्टि ठेवून केलेलीं कथाकीर्तनें कितीशीं प्रभावी होतील!

आज कथाकीर्तनांचा सुकाळ झाला असूनही लोक खरोखरी देवाकडे वळलेले दिसत नाहींत, त्याचें रहस्य वरील संत-वचनांतच आहे.

## तेंही एक सत्यच नव्हे का?

'जीवनांत ज्याचा मला उपयोग होतो तें सत्य होय' अशी उपयुक्तता वादाचा पुरस्कार करणाऱ्या विलिअम जेम्स साहेबांनीं 'सत्याची' व्याख्या केलेली आहे. (सद्धर्म, एप्रिल १९७४ पृष्ठ ७).

'उपयुक्त तें सत्य' हें जर मान्य तर आस्तिक्यबुद्धि म्हणजे देव आहे अशी श्रद्धा ही जीवनांत शांति मिळवून देण्याच्या दृष्टीनें जर कुणास उपयुक्त होत असेल तर तेंही 'सत्यच' नव्हे का? त्याला 'vulgar sentimenta lism'—ग्राम्य भावनावशता असें तुम्हीं उपयुक्ततावादी कसे म्हणतां?

देणगी मनिऑर्डरनें धाडण्याचा पत्ता
**श्री. भालचंद्र उपासनी**
३३८ सॅम्युअल स्ट्रीट
पो. बॉ. नं. ३३६८ मुंबई ३

## संस्कृतीचा एक विशेष

भांड्याला भांडें लागून आवाज (नाद) होऊं लागला कीं त्या भांड्यांना हात लावून नाद लगेच बंद करायची आपल्यांत एक जुनी चाल आहे. भांडण सुरूं झालें कीं लगेच तें मिटवण्याचा प्रयत्न करावा असा या चालीचा अर्थ असला पाहिजे.

प्रतीकरूपी (Symbolic) चालीरीति निर्माण करून जीवन समृद्ध बनविणें हा आपल्या संस्कृतीचा (म्हणजे जीवन पद्धतीचा) एक विशेष आहे.

**पुढील अंक नेहमीप्रमाणें एप्रिल महिन्यात प्रसिद्ध होईल.**

सद्धर्म प्रकाशन कार्यालय
९ ओवेनडन रोड मुंबई नं. ७
फोन ३५८४१३
भेटण्याची वेळ : दुपारी ४ ते ६

मुद्रक व प्रकाशक : भालचंद्र उपासनी. सद्धर्म प्रकाशन, ९ ओवेनडन रोड, मुंबई ७
मुद्रणस्थळ : मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगाव, मुंबई ४